**नमुना दोन**

जाक्र ठाजिप/शिक्षण/प्राथ/प्रास-२/वशी /
शिक्षण विभाग (प्राथ.) जि.प. ठाणे
दिनांक :- ०१/०४/२०२५

प्रति,

व्यवस्थापक:- दार उल रेहमत ट्रस्ट, ठाणे
दुरध्वनी:- ८७७९९१८८२३
ई मेल:- drt.khis२०२१@gmail.com

**विषयः** - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम, ११ पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

**संदर्भ:**- १) मा. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद शिक्षण विभाग, ठाणे यांचेकडील दि . १८/६/२०२५ रोजीची पडताळणी सूची

आपल्या दिनांक ०१/०४/२०२५ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला/ पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद ठाणे दि. ०१/०४/२०२५ पासुन ते दि.३१/३/२०२८ पर्यंतच्या कालावधीसाठी इ.१ ली ते इ.८ वी करिता डी.आर.टी नॉलेज हब इंटरनॅशनल स्कूल सर्व्हे नं.१०१, हिस्सा नं.७, कौसा मुंब्रा ता.जि.ठाणे (शाळेचे नाव, पत्यासह) शाळेस मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.

३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील त्या विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निदिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतीपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था/ शाळा कोणतेही कंपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)** कोणत्याही बालकास प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)** प्रारंभिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

**(पाच)** विकलांक/ विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)** अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

**(आठ)** शिक्षकाने / शिक्षकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेवू नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समूचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमांचे पालन करील.
९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या-:

| | |
|---|---|
| * शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | :- ५८८७.५३ चौ.मी. |
| * एकूण बांधकाम क्षेत्र | :- ३२१५.५७ चौ.मी. |
| * खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | :- २६७२.४ चौ.मी. |
| * वर्ग खोल्या संख्या | :- ६४ |
| * कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली | :- २२ |
| * मुलांसाठी व मुलीसाठीह स्वतंत्र प्रसाधनगृह वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. | :- आहे |
| * पिण्याच्या पाण्याची सुविधा | :- आहे |
| * दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | :- लागूनाही |
| * अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता | :- आहे |
| * वाचन साहित्य विनासायास उपलब्ध | :- आहे |

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्याच्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६०चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.
१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक TH-TMC-P-86 असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.
१७. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.
१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.
२०. मुख्याध्यापक डी.आर.टी नॉलेज हब इंटरनॅशनल स्कूल सर्व्हे नं.१०१, हिस्सा नं.७, कौसा मुंब्रा ता.जि.ठाणे यांनी त्यांच्या शाळेस आरटीई पुनर्मान्यता नमुना नंबर २-मिळणेबाबत प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रके बाबत कोणत्याही प्रकारची तक्रार उदभवल्यास अथवा खोटी व दिशाभूल करणारी कागदपत्रके आढळून आल्यास या कार्यालयाकडुन देण्यात आलेले आरटीई पुनर्मान्यता नमुना नंबर-२ रद्द समजण्यात यावे.

(बाळासाहेब राक्षे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद ठाणे

DRT Knowledge Hub International School
Principal

DRT Knowledge Hub International School
Manager

**R.T.E Namuna 2**

Jak Thajip/Education/Primary/Pras-2/Vashi/
Education Department (Primary) Z.P. Thane
Date: 01/04/2025

To,

Manager: Daar Ul Rehmat Trust, Thane
Phone: 8779918823
E Mail :- drt.khis2021@gmail.com

**Subject:-** For the purposes of section 18 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, rules 11, sub-rule (4) of the Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 regarding granting recognition certificates to implementing schools.

**Reference:-** 1) Hon. Education Officer Zilla Parishad Education Department, Thane dated 18/6/2025 checklist

Based on the inspection of the school in relation to your application dated 01/04/2025 and subsequent correspondence with the school in this regard.

I, the Education Officer (Regional), Zilla Parishad Thane, hereby grant approval to the school **D.R.T Knowledge Hub International School** Survey No. 101, Plot No. 7, Kausa Mumbra Tal. Dist. Thane (Name of the school, along with address) for classes 1 to 8 for the period from **01/04/2025 to 31/3/2028.** The above approval is subject to the fulfillment of the following conditions.

1. The period of recognition will not be extended and no recognition or affiliation will be granted after class VIII.

   There will be no obligation under the circumstances.
2. The school shall comply with the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (Annexure One) and the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 (Annexure Two).
3. The school shall admit children from the weaker sections and disadvantaged groups in the vicinity to the first standard, up to a minimum of 25% of the student strength in that standard, and shall provide them with free and compulsory education till the completion of elementary education, provided that this standard shall also be followed in the case of pre-primary grades.
4. The school shall be provided with a separate bank account for the purpose of receiving reimbursement for the children referred to in paragraph 3 as per section 12(2) of the Act.
5. The institution/school will not charge any competition fee and will not force the child or his or her parents or guardians to undergo any screening process.
6. No child shall be denied admission to school on the grounds of religion, caste or creed, place of birth or any of these grounds, without proof of age.

NOTARY PARVEZ AHMED SHAIKH MUMBAI THANE DIST (MAHA) Regd. No. 11262/15 GOVT. OF INDIA

7. (i) No child admitted to school shall be retained in the same grade in which he is enrolled or shall be expelled from school until the completion of his elementary education.

(ii) No child shall be subjected to physical punishment or mental torture.

(iii) No child shall be required to pass any board examination until the completion of elementary education.

(iv) Every child who has completed elementary education shall be given a certificate as prescribed under rule 23.

(v) Students with disabilities/special needs shall be included as per the provisions of the Act.

(vi) Teachers holding the minimum qualification prescribed under section 23(1) of the Act shall be appointed. Provided further that teachers who do not hold the minimum qualification on the date of commencement of the Act shall have to acquire such minimum qualification within a period of 5 years.

(vii) The teacher shall perform his/her duties as specified in section 24(1) of the Act and

(viii) The school shall ensure that the teacher does not engage himself/herself in private tutoring.

8. The school will follow the curriculum prepared on the basis of the curriculum prescribed by the appropriate authority.

9. The school shall admit students in proportion to the facilities available in the school as prescribed in Section 19 of the Act.

10. The school shall comply with the standards and norms specified in Section 19 of the Act. The facilities available in the school at the time of the last inspection were as follows:

| | |
|---|---|
| *Area of the school premises | :- 5887.53 sq.m. |
| *Total construction area | :- 321557 sq.m. |
| *Playground area | :- 2672.4 sq.m. |
| *Number of class rooms | :- 64 |
| *Office-store-headmaster's room | :- 22 |
| *There will be sufficient water to use separate toilets for boys and girls and to keep the toilets clean and hygienic. | :- Yes |
| *Drinking water facility | :- Yes |
| *Kitchen for cooking lunch | :- Not Applicable |
| *Availability of teaching and learning materials/ games and sports related materials/ library | :- Yes |
| *Reading materials are freely available. | :- Yes |

11. Unapproved classes or groups cannot be run in the name of the school, on the school premises or elsewhere.

NOTARY
PARVEZ AHMED SHAIKH
MUMBAI & THANE DIST (MAHA)
Regd. No. 11262/15
GOVT. OF INDIA

12. The school building or other structure or playground shall be used only for the purpose of education and skill development.
13. The school is being run by a society registered under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or the Bombay Public Trusts Act, 1950.
14. The school is not run for the benefit of any individual, group or association of individuals or any other person or for the purpose of making any profit.
15. The accounts of the school should be audited and certified by a chartered accountant and proper accounts should be prepared as per the rules. A copy of each statement should be sent to the District Education Officer every year.
16. The accreditation code given to your school is TH-TMC-P-86. Please note that this should be quoted in all correspondence with this office.
17. The school shall submit such reports and information as the Director of Education/District Education Officer may request from time to time or shall comply with such instructions as the Government or local authority may give to ensure the continued fulfillment of the conditions of recognition of the school or to rectify deficiencies in the functioning of the school.
18. Ensure that the organization's registration, if any, is renewed.
19. Other conditions as per Annexure Three are attached herewith.
20. Principal D.R.T Knowledge Hub International School Survey No. 101, Block No. 7, Kausa Mumbra, T.D. Thane, if any complaint arises regarding the documents submitted with the proposal for obtaining RTE Re-Recognition Form No. 2 for his school or if any false and misleading documents are found, the RTE Re-Recognition Form No. 2 issued by this office should be considered cancelled.

(Balasaheb Rakshe)
Education Officer (Primary)
Zilla Parishad Thane

NOTARY PARVEZ AHMED SHAIKH MUMBAI & THANE DIST (MAHA) Regd. No. 11262/15 GOVT. OF INDIA

23 AUG 2025

Attested by me
PARVEZ AHMED SHAIKH
ADVOCATE & NOTARY GOVT. OF INDIA
Shop No. 4/A, New Aadarsh Co-op. Hsg. Soc.,
Opp. Kadam Hall, Canara Bank, Mumbra,
Dist. Thane-400612. Mob: 9987160674

DRT Knowledge Hub International School
Principal

DRT Knowledge Hub International School
Manager

NOTARY PARVEZ AHMED SHAIKH MUMBAI & THANE DIST (MAHA) Regd. No. 11262/15 GOVT. OF INDIA